जाक्र/ठाआ/प्रशा/वाहतूक/ ५४ /२०१७
पोलीस उप आयुक्त,वाहतूक विभाग,ठाणे शहर
दिनांक :– १७/१०/२०१७

## वाहतूक नियंत्रण अधिसुचना

कल्याण शहरातील भिवंडी कल्याण शिळ फाटा रस्त्यावरील गोविंदवाडी बाह्यवळण रस्त्यावरील जुना पुल तपासणी तसेच पुलाचे स्ट्रकचलर स्टॅबीलीटी तपासणीचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई यांचे कडून दिनांक २२/१०/२०१७ रोजी सकाळी १२.०० वा. ते दिनांक २३/१०/२०१७ रोजी दुपारी १३.०० वाजेचे दरम्यान आहे. सदरचे काळात पत्रीपुल--गोविंदवाडी बाह्यवळण रस्ता ते दुर्गामाता चौक या दोन्ही बाजूकडील येणे जाण्याचे मार्गावरील सर्व प्रकारची वाहतुक बंद करणे आवश्यक आहे. सदर काळात कल्याण शहरातील वाहतूक सुरळीत व सुरक्षीत चालावी व वाहतूकीची कोंडी होवू नये या करीता आम जनतेच्या सोई साठी

महाराष्ट्र शासन गृहविभाग एम.व्ही.ए.--११६/सी.आर/३७/टी.आर.दि.७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटारवाहन कायदा कलम ११५,११६(१)(अ)(ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून, मी अमित काळे, पोलीस उपायुक्त, वाहतुक विभाग, ठाणे पुढीलप्रमाणे आदेश करीत आहे.

१) दुर्गामाता चौक – गोविंदवाडी बाहयवळण रस्त्याकडून पत्रीपुलाकडे जाणारे सर्व प्रकारचे वाहनांना दि. २२/१०/१७ रोजी १०.०० वाजे पासून ते दिनांक २३/१०/२०१७ रोजीदुपारी १६.०० वाजे पावेतो दुर्गामाता चौक गोविंदवाडी बाह्यवळण येथून **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

<u>पर्यायी मार्ग</u> :– सदरची वाहने जुना आग्रारोड या मार्गाने दुर्गाडी येथुन लालचौकी, सहजानंद चौक, शिवाजीचौक, गुरूदेव हॉटेल, वलीपीर, येथुन पत्रीपुल मार्गे इच्छित स्थळी जातील.

२) पत्री पुलाकडून गोविंदवाडी बाहयवळण मार्गावरून दुर्गाडी कडे जाणारे सर्व प्रकारचे वाहनांना दि. २२/१०/२०१७ रोजी १०.०० वाजे पासून ते दिनांक २३/१०/२०१७ रोजी दुपारी १६.०० वाजे पावेतो पत्रीपुल गोविंदवाडी बाहयवळण येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

<u>पर्यायी मार्ग</u> :– सदरची वाहने जुना आग्रारोड या मार्गाने पत्रीपुल, वलीपीर, गुरूदेव हॉटेल, शिवाजी चौक, सहजानंद चौक, लालचौकी, मार्गे दुर्गाडी येथुन इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही गोविंदवाडी बाह्यवळण रस्त्यावरील जुना पुल तपासणी तसेच पुलाचे स्ट्रकचलर स्टॅबीलीटी तपासणीचे कालावधीत म्हणजेच दि. २२/१०/१७ रोजी १०.०० वाजे पासून ते दिनांक २३/१०/२०१७ रोजीदुपारी १६.०० वाजे पावेतो अंमलात राहील.

(अमित काळे)
१७/१०/१७
पोलीस उप आयुक्त,
वाहतुक नियंत्रण विभाग, ठाणे.

**<u>प्रति,</u>**
जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**<u>प्रत माहितीसाठी:–</u>**
जिल्हा अधिकारी ठाणे
आयुक्त,क.डो.म.पा./भिवंडी महानगरपालीका
प्रादेशिक परीवहन अधिकारी,कल्याण
विभाग नियंत्रक राज्य परीवहन विभाग ठाणे कल्याण/
वि.वाडी/भिवंडी
परिवहन व्यवस्थापक कल्याण डोंबिवली महानगरपालीका
पोलीस नोटीस प्रसिध्दीस – ९ ए.एस.